# प्रेसनोट दिनांक – २१/१०/२०२४

**दि. २०/१०/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ४३४/२०२४ भा.न्या.सं.कलम ३१८(४), ३३६(२)(३), ३३८. सह परकीय नागरीक अधिनियम कलम १४(अ)(क) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०१७ पासुन ते दि.२०/१०/२०२४ रोजी पर्यत हैद्राबाद तेलंगणा, काकीनाडा-आंध्रप्रदेश, निगडी, उंड्री पुणे शहर पिंपळे गुरव,पुणे. येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी ०२/३७ वा. |
| फिर्यादी | :- | राहुल हरिनाथ सुतार, वय-४० वर्ष, पो.हवा. नेमणूक-सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरीचिंचवड, |
| आरोपी | :- | चिडीऐबेरे मोसेस ओगबोडो, देश-नायजेरिया सध्या रा. शर्मा हाऊस, प्रभातनगर, स.नं.७७, पिंपळे गुरव, पुणे-२७ **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील नायजेरियन नागरिक नमुद आरोपी याने अवैधरित्या वास्तव्यास राहुन जाणीवपूर्वक भारतीय नागरिकांना दयेय असलेले मतदान ओळखपत्र व पॅनकार्ड गैरमार्गाने मिळवले तसेच आधारकार्ड मिळवण्यासाठी अर्ज क्र. ४०५०/००१२९/०३२४२ अन्वये काकीनाडा, आंध्रप्रदेश येथे अर्ज केलेला आहे. आणि वास्तव्याकरिता व्हिसा ची मुदतवाढ न घेता विनापरवाना अवैधरित्या वास्तव्य तसेच व्यवसाय करुन व्हिसा नियमांचे उल्लंघन करुन भारत सरकारची फसवणूक केली आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि भालेराव ९०६७०२३९४४ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ६५३/२०२४ भा.न्या.सं.कलम ११८(२),३५२ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/१०/२०२४ रोजी १४.३० वा.चे सुमारास इंदलनर्सरी बालाजी फर्निचर दुकरनाचे बाजुला धावडे वस्ती भोसरी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी १७.२७ वा. |
| फिर्यादी | :- | अजिंक्य तानाजी कुदळे, वय ३३ वर्ष, धंदा व्यवसाय, रा.धर्माअर्पाटमेंट, एफ विंग प्लॅट नं. ३ पिंपरीगाव पुणे, |
| आरोपी | :- | एमएच ११ बीएल ५८१५ वरील चालक नामे एकनाथ सुदाम जाधव,वय अंदाजे ३७ वर्ष, रा. दिघी पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपीने फिर्यादी यांचे जवळ येवुनगाडी बाजुला घे असे म्हणाल्यावर, फिर्यादी यांनी त्यास कुंडया खाली घेवुन झाले की, गाडी बाजुला घेतो असे म्हणाल्याने नमुद आरोपीने त्याचा राग मनात धरुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्याचे गाडीतील लोखंडी टॉमीने फिर्यादी यांचे डाव्या पायावर गुडघ्या जवळ तसेच उजव्या पायावर गुडघ्या जवळ मारुन फिर्यादी यांना जबर दुखापत केली आहे. तसेच फिर्यादी यांचा मित्र सुनील प्रजापती याचे अंगावर लोंखडी टॉमीघेवुन धावुन गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि दशवंत ९०४९६२४५४० |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ७०६/२०२४ भा.न्या.सं.कलम ११८(१),३२४(४), ३५२,३५१(३), ३(५) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी ००/०५ वा.चे सुमारास ता. खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी १४.४१ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी व्यवसाय घरकाम रा. ता. खेड, जि. पुणे |
| आरोपी | :- | १.स्वयंम सबाजी सावंत, २.सोनू बहिरु केदारी दोघे रा. ता. खेड, जि. पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी जानेवारी २०२४ मध्ये सप्ताहाचे कार्यक्रमात सबाजी सावंत याचे हातातून फिर्यादीचे पती बबन सावंत यांनी माईक काढून घेतला होता त्याचे रागातून सबाजी सावंत याचा मुलगा आरोपी क्र १ याने त्याचा मित्र आरोपी क्र २ याचेसह फिर्यादी यांचे घरी येवून फिर्यादीचे पती बबन व फिर्यादी यांना शिविगाळ करुण सेफ्टी दरवाजाचे जाळीमधून प्लॅस्टीकचे बाटलीमधून पोल्ट्रीफार्म मध्ये सफाईकरीता वापरण्याचे फॉरमोलीन नावाचे पातळ औषध त्यांच्या चेह-यावर टाकून फिर्यादी यांचे पती बबन यांचे डोळ्यांस दुखापत करुण त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी देवून दुकानाचे शटरवर, घराचे दरवाजावर तसेच मोटर सायकलवर दगडाने, लाकडी दांडक्याने मारुण नुकसान केले आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा १३४५ चासकर ९५९४९८९८४८ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ५३९/२०२४ भा.न्या.सं.कलम १०६(१),२८१,१२५(ब),३२४(४) सह मोवाका कलम ११९/१७७,१८४, १९९ए (१)(२) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी १६/३० वा. सुमारास एम.आय. डि.सी. भोसरी पोलीस स्टेशन समोर स्पाईन रोड भोसरी पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी २२.२३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी काम नोकरी, रा.,लांडेवाडी,भोसरीपुणे |
| आरोपी | :- | १)थ्री व्हिलर टेम्पो क्र.एम.एच.१४ के.यु.७९७० वरील चालक विधी संघर्षित बालक वय-१७ वर्षे,११ महिणे २६ दिवस, शिक्षण, रा.इंद्रायणीनगर,भोसरी,पुणे.<br>२) श्रीनिवास थोरात रा.राजवाडा, इंद्रायणीनगर,भोसरी,पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या दुचाकी वरुन मुलगा वय- १२ वर्षे, व त्याची लहान बहिण वय- ०७ वर्षे, यांना क्लास सुटल्यावर त्यांना घेवुन राहते घरी इंद्रायणीनगर येथे जात असतांना, एम.आय.डि.सी.भोसरी पोलीस स्टेशनच्या समोरील चौकातुन,उजवीकडे पी.सी.एन.डि.टि.सर्कलच्या दिशेने पोलीस स्टेशन समोरुन जात असताना,संत नगर चौकाकडुन सर्विस रोडने विधीसंघर्षित बालक याने त्याचे ताब्यातील थ्री व्हिलर टेम्पो हा हयगयीने अविचाराने निष्काळजीपणे भरधाव वेगात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करुन,चालवुन फिर्यादी हे चालवत असलेल्या स्कुटीला डाव्या बाजुने डॅश देवुन,अपघात करुन,झालेल्या अपघातामध्ये फिर्यादी यांचा मुलगा, वय- १२ वर्षे, याच्या मृत्युस व हर्षिका हिला जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे व फिर्यादीचे स्कुटीचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे.तसेच थ्री व्हिलर टेम्पो मालक आरोपी क्र २ यांना टेम्पो चालविणारा मुलगा हा अल्पवयीन असल्याचे माहिती असतांना व त्याचे कडे वाहन चालविण्याचे लायसन्स नसतांना त्याला थ्री व्हिलर टेम्पो चालविण्यास दिला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चिट्टमपल्ले ९५९५१७९४३८ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड (काळेवाडी) ११३६/२०२४ भा.न्या.सं.कलम २८१,१२५ अ,ब,३२४(४) मो.व्हि.ॲक्ट कलम १२२,१८४, ११९/१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१९/१०/२०२४ रोजी १८:२० वा.चे सुमारास बादशहा चहाचे समोर जोतीबा गार्डन काळेवाडी पुणे येथे बी आर टी लेनने जात असताना |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१०/२०२४ रोजी २३.१६ वा. |
| फिर्यादी | :- | राज शेखर सिदरामप्पा बिराजदार वय.४३ वर्ष धंदा-टेम्पो चालक रा.साईबाबा मंदिराजवळ, गुरुव्दारा चौक,वाल्हेकरवाडी चिंचवड पुणे |
| आरोपी | :- | सुनिलकुमार राजेशकुमार बिष्णोई वय २१ वर्ष रा.बाणेर पुणे व मुळगाव-बाडमेर छोटन चौराया बाडमेर राजस्थान<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे कडील तीन चाकी टेम्पो गाडी नंबर एम.एच १४ इ.एम १४७२ ही घेवुन चिंचवड कडे बीआरटी लेनने जात असताना अचानकपणे ज्युपीटर गाडी नंबर एम.एच १४/एल.एन.२११३६ वरील चालक नमुद आरोपी याने त्याची गाडी भरधाव वेगाने निष्काळजीपणे रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन विरुध्द दिशेने येवुन फिर्यादीचे टेम्पोस समोरुन धडक देवुन फिर्यादीस व स्वतः गंभीर जखमी होवुन दोन्ही गाडयांचे नुकसान करण्यास कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि निंबाळकर ९८८१२५२९३० |